# एमआयडीसीत ८ एकरांवर 'ट्री पार्क'चा प्रारंभ

## आसमंत फाउंडेशनतर्फे कार्यक्रम : आयुर्वेदिक, वनोपयोगी झाडांचा समावेश

**सकाळ वृत्तसेवा**

रत्नागिरी, ता. १२ : येथील एमआयडीसीमध्ये ८ एकर जमिनीवर आजपासून आसमंत बेनव्हेलन्स फाउंडेशनतर्फे ट्री पार्क उभारण्याचा प्रारंभ झाला. वड, पिंपळ, सीता अशोक, औदुंबर, अर्जुन व रुद्राक्ष आदी झाडे लावण्यात आली. ज्येष्ठ पक्षीनिरीक्षक किरण पुरंदरे यांच्या नेतृत्वाखाली ट्री पार्क उभारले जात आहे.

गेल्या वर्षी 'आसमंत'ने पुरंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षी निरीक्षणाचा कार्यक्रम घेतला. त्यातून ट्री पार्क उभारण्याची संकल्पना सुचल्याचे आसमंतचे प्रमुख व उद्योजक नंदकुमार पटवर्धन यांनी सांगितले. त्यानुसार एमआयडीसीची आठ एकर खुली जागा घेतली. पार्कच्या प्रवेशदारापाशी अनेकजण कचरा टाकत होते; परंतु आता हा कचरा दूर केला. दोन दिवसांपासन कातळ जमीन असल्याने येथे दोन दिवसांपूर्वी खड्डे खणण्यात आले. रविवारी सकाळी वृक्षारोपण झाले. ट्री पार्कमध्ये सध्या ब्राह्मणी घार, बुलबुल, चिमण्या, भारद्वाजसह अनेक पक्ष्यांचे वास्तव्य आहे. येथे विविध प्रकारच्या वनस्पतींची लागवड केल्यावर अधिवास वाढेल व त्यातून पक्षीनिरीक्षण, विज्ञानच्या विद्यार्थ्यांना संशोधकांस संधी देण्याचा आसमंतचा मानस आहे. पक्ष्यांचा अधिवास वाढवण्यासाठी पक्ष्यांना आवश्यक झाडांची लागवड करण्यात येणार आहे. सातरिठा, ऐन, पिंपळी, सुरंगी, काळा कुडा, अर्जुन, भारंग, पळस, सोमसावर, काटेसावर, कळंब, टेटू, खरळ, बकुळ, कडूनिंब, अडुळसा, बेल, आवळा, अश्वगंधा आदी झाडे लावण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात लहान व पाच फुटापर्यंत उंच वाढलेली झाडे लावली जातील.



रत्नागिरी : आसमंत फाउंडेशनतर्फे एमआयडीसीत आठ एकरांवर ट्री पार्कमध्ये वृक्षलागवडीस रविवारी प्रारंभ झाला.

नंदकुमार पटवर्धन यांनी सांगितले, "आसमंततर्फे गतवर्षी शाळा, महाविद्यालयांमधील २५ विद्यार्थी दत्तक घेतले होते. त्यांचे प्रगतीपुस्तक पाहून त्यांना पुन्हा दत्तक घेऊ आणि शाळांनी सांगितलेल्या गरजू १० विद्यार्थ्यांना दत्तक घेणार आहोत. तसेच शाळांकडून शिफारस आलेल्या २५ विद्यार्थ्यांना गणवेश दिले जाणार आहेत."